# प्रकरण दुसरे

# रणजित देसाई व अरविंद दाढे यांचे वाङ्‌मयीन कर्तृत्व

# प्रकरण दुसरे

## रणजित देसाई व अरविंद दाढे यांचे वाङ्मयीन कर्तृत्व

**लेखकांचा साहित्य परिचय :-**

**अ) रणजित देसाई :-**

**- अल्पपरिचय -**

कथा, कादंबरी आणि नाटक या तीनही वाङ्मयक्षेत्रांत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणारे लेखक म्हणून रणजित देसाई हे नाव सर्वपरिचित आहे. 'स्वामी' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाल्यापासून ते 'स्वामीकार' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या साहित्याला लोकमान्यता आणि राजमान्यता प्राप्त झाली. उमद्या, दिलदार मनाचा थोर साहित्यिक म्हणून वाचकांच्या मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण झाला. कथा, कादंबरी आणि नाटक याप्रमाणेच त्यांनी अल्पप्रमाणात काव्यलेखनही केले. स्वत:च्या काही कादंबऱ्यांची त्यांनी केलेली नाट्यरूपांतरे लक्षवेधी ठरली. प्रा. वसंत कानेटकर यांच्या सहकार्याने 'श्रीमान योगी' या कादंबरीवर आधारीत 'गरूडझेप' नावाचे नाटक लिहून दोन नामवंत नाटककारांनी मिळून एका नाट्यकृतीला जन्म देण्याचा नवा उपक्रम त्यांनी राबवला.

रणजित देसाई यांनी आपल्या लेखनाची सुरूवात कथालेखनाने केली. पण त्यांच्या अनुभवविश्वाचा आवाका दांडगा असल्याने कालांतराने त्यांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार अनुसरला. कथाकार किंवा नाटककार म्हणून ते वाचकांना फारसे परिचित झाले नाहीत. कादंबरीकार म्हणूनच त्यांना नावलौकिक लाभला. चार चित्रपटांच्या पटकथाही त्यांनी लिहिल्या. शेवटपर्यंत त्यांच्या लेखनात खंड पडला नाही.

कोवाड हे कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील ताम्रपर्णी नदीच्या काठावर वसलेले एक गाव. गाव महाराष्ट्रात असले तरी बेळगावपासून केवळ १६-१७ मैलांच्या अंतरावर असल्याने कर्नाटकाशी अनेक बाबतीत जवळीक आढळते. हे गाव महाराष्ट्र

आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील जनतेच्या मनात वसण्यास मात्र रणजित देसाई कारणीभूत ठरले. रणजित देसाई यांचे वडील रामचंद्रराव देसाई कोवाडचे इनामदार होते. कोवाड परिसरातील ३०-४० गावांची जहागिरी ते सांभाळत असत. एका छोट्याशा टेकडीवर वसलेल्या आणि तिन्ही बाजूंनी नदी असलेल्या कोवाड गावचे ते वतनदार होते. अशा घराण्यात ८ एप्रिल १९२८ रोजी रणजित देसाई यांचा जन्म झाला. त्यांचे आजोळ कोल्हापूर. साईक्स एक्सटेन्शनमध्ये असलेल्या दत्तवाडकरांच्या जुन्या पद्धतीच्या टुमदार बंगल्यात ते जन्मले. त्यांच्या मातोश्री अतिशय देखण्या, हुशार आणि करारी होत्या. त्यांचा अध्यात्माकडे विलक्षण ओढा होता. भक्तिभावात रंगून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. विशेष म्हणजे त्यांनी स्वत: खूप भक्तिपदे रचली होती. पहाटे एकतारीवर भजन गाण्यात, गोरगरिबांना विविध प्रकारची मदत करण्यात त्यांना धन्यता वाटायची. म्हणजे स्वत: खानदानी वातावरणात वावरत असूनही गावातील सर्वसामान्य कुटुंबातील लोकांविषयी त्यांच्या मनात उत्कट जिव्हाळा होता. अशा भावूक, प्रेमळ, परोपकारी वृत्तीच्या मातेपोटी रणजित देसाई जन्मले. पण मातेच्या ममतेची जाणीव होण्याइतपत कळण्यापूर्वीच त्यांच्या आई त्यांना कायमच्या सोडून गेल्या. परिणामी त्यांना कोवाड सोडून कोल्हापुरातच आजीकडे येऊन राहावे लागले.

रणजित देसाईंना मातृवियोगाचे दु:ख कळणे शक्य नव्हते. या दु:खाची कसलीही झळ त्यांना पोचू नये व रणजितच्या बालमनावर कसलाही प्रतिकूल परिणाम होऊ नये म्हणून रामचंद्ररावांनी खूप काळजी घेतली. त्यांचे व्यवस्थित पालनपोषण व्हावे म्हणून कोल्हापुरला त्यांच्या आजीकडे पाठवले. तेव्हापासून रणजित देसाईंचा कोवाड-कोल्हापूर असा प्रवास जीवनाचा प्रवास संपेपर्यंत सुरू राहिला. रणजित देसाईंना लहानपणापासूनच प्रवासाची खूप आवड होती. या आवडीला त्यांच्या आजींचे खूप प्रोत्साहन लाभले. संपूर्ण उत्तर हिंदुस्थानचा प्रवास त्यांनी केला. विविध शहरे, तेथील प्रेक्षणीय स्थळे आणि लोकजीवन त्यांनी बारकाईने पाहिले. त्याचा उपयोग त्यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यातील स्थलवर्णनासाठी

करून घेतला. 'राजा रविवर्मा' सारख्या कादंबरीत महाराष्ट्राबाहेरील लोकजीवन रेखाटताना या प्रवासाचा त्यांना खूपच उपयोग झाला.

आजीचे प्रेम लाभल्यामुळे रणजित देसाईंना मातेच्या अकाली वियोगाचे दु:ख फारसे भोगावे लागले नाही. पण अंतर्मनातील मातृवियोगाची बोचणी मात्र ते टाळू शकत नव्हते. 'रूपमहाल' या पहिल्याच काव्यसंग्रहाच्या अर्पणपत्रिकेत -

''आई ! करावया तू नाहीस कौतुकाला
या न्यूनतेमुळे ही मज त्याज्य पुष्पमाला
पंचारती जनाची ना तोषवी मनाला;
परि जीव बालकाचा तव कौतुका भुकेला.''

अशा भाषेत त्यांनी आईविषयीची ओढ व्यक्त केली आहे. आई नसतानाही आजीमुळे त्यांचे बालपण अत्यंत मजेत व सुखात गेले. मोठेपणी आपला नातू एवढा लेखक होईल याची त्यावेळी आजींनी कल्पना करणेही शक्य नव्हते. पण त्यांच्या 'मोठे'पणाला खतपाणी घालण्याचे, वळण लावण्याचे, योग्य दिशा देण्याचे काम सर्वप्रथम त्यांच्या आजीने केले. एका अर्थाने, रणजित देसाईंच्या पुढील यशस्वी जीवनाचा पाया त्यांनी घातला.

शाळेत असतानाच रविंद्रनाथ टागोरांची 'गीतांजली' त्यांनी वाचली. तेव्हा त्याचा अनुवाद करण्याची रणजित देसाईंना इच्छा झाली. अर्थात, ही अगदी सुरूवातीच्या काळातील घटना होती. त्यावेळी कोल्हापुरात 'महाद्वार' नावाचे नियतकालिक निघत होते. व्यं.न. कुलकर्णी त्याचे संपादक होते. त्यात रणजित देसाईंनी केलेला अनुवाद छापून येऊ लागला. मग मात्र त्यांना मनोमनी वाटू लागले की, आपणही स्वतंत्र काहीतरी लिहावे; आणि त्यांनी लिहायला सुरूवात केली.

वयाच्या अठराव्या वर्षी रणजित देसाईंनी एक कथा लिहिली. 'महाद्वार' च्या संपादकाकडे पाठविली. पण संपादकांनी कथा नाकारली. तेव्हा रणजित देसाईंच्या कोवळ्या

मनाला अतिशय दु:ख झाले. अर्थात, ते स्वाभाविकच होते. कारण पहिल्याच घासाला खडा लागला होता. ते नाउमेद झाले पण त्यांच्या शाळेतील जोशी सरांनी त्यांना विचारले, ''कथा छापण्याच्या लायकीची आहे का ?'' रणजित देसाईंनी होकार देताच जोशी सर पुढे बोलले, ''अरे, असा निराश काय होतोस ? दुसरीकडं प्रयत्न करून बघ.'' तेव्हा रणजित देसाईंनी ती कथा पुन्हा तीनचार वेळा लिहून काढली. आपल्या परिश्रमाला फळ मिळेल या आशेने त्यांनी ती 'प्रसाद' मासिकाकडे पाठविली, आणि त्यांचा अंदाज तंतोतंत खरा ठरला !

लेखकांची नावे न देता 'प्रसाद' मासिकाच्या (नोव्हेंबर, १९४७) दीपावली लघुकथा स्पर्धेत 'भैरव' ही कथा प्रसिद्ध झाली. या अंकात चाळीस कथा प्रसिद्ध केल्या आणि वाचकांची मते मागविली. रणजित देसाईंच्या 'भैरव' ला तृतीय क्रमांक लाभल्याचे एप्रिल १९४८ च्या अंकात जाहीर झाले. अशाप्रकारे त्यांची पहिलीवहिली कथा वाचकप्रिय आणि बक्षिसपात्र ठरली. या अंकात सुप्रसिद्ध मराठी कथाकार आणि 'प्रसाद' चे संपादक य.गो. जोशी यांनी लिहिले होते, ''या कथा स्पर्धा अंकाकरिता आलेल्या कथांपैकी पहिल्या कोणत्या गोष्टीने माझ्या मनावर परिणाम केला असेल तर तो 'भैरव' या गोष्टीने ....''

शाहू महाराजांच्यासारखे कलाप्रेमी राजे कोल्हापूरला लाभले. कला, संगीत, कुस्ती इत्यादींना त्यांनी प्रोत्साहन दिले. कोल्हापूर हे 'कलापूर' होण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. या कलात्मक वातवरणाचा बराच परिणाम रणजित देसाईंच्यावर झाला. या संस्थानामध्ये सर्वच कलावंतांच्या गुणांना वाव मिळत असे. कलेचे, संगीताचे, चित्रकलेचे अनेक जाणकार, दर्दी यांना प्रोत्साहन  व सहकार्य मिळत असे. मुळातच रणजित देसाई हे इनामदार घराण्याचा वारसा घेऊन जन्माला आलेले ध्येयवादी कलावंत. कोल्हापूर आणि बडोदा येथील राजघराण्यांशी त्यांचा संबंध होता. कोल्हापुरात आजीकडे आणि बडोद्यात मावशीकडे त्यांचे सतत वास्तव्य असायचे. त्यामुळे या दोन संस्थानी वातावरण लाभलेल्या शहरांशी त्यांचा जवळून संबंध आला. राजघराण्याची पूर्वरूपे शोधण्याच्या प्रेरणेतून कर्मठ, काहीशी

मरगळलेली, खुजी झालेली, काहीशी किडलेली स्थिती पाहून त्यांना वाटू लागले की, यांचे पूर्वज कोण होते, त्यांनी काय घडवले, ते कसे जगले हे कलात्मक पातळीवरून दाखवून द्यावे. पूर्वस्वरूपाचा शोध घेण्याच्या या प्रवृत्तीतून ते दूरच्या भूतकाळाकडे वळले. त्यातूनच 'राधेय' सारखी पौराणिक, 'स्वामी-श्रीमान योगी' सारख्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा जन्म झाला. विशिष्ट प्रकारची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या कथांना आणि नाटकांनाही त्यांनी जन्म दिला. आपण कोण होतो याचा कलावंत मनाने घेतलेला शोध अशा सर्व वाङ्मयीन कलाकृतींतून पाहण्यास मिळतो.

रणजित देसाई हे जसे प्रतिभावंत लेखक होते तसेच ते जातिवंत शेतकरी होते. शेती हा त्यांचा एक महत्त्वाचा छंद होता. ते स्वत:ला लेखकापेक्षाही शेतकरी मानत होते. शेतीकडे धंदेवाईक दृष्टीने न बघता जरूर तेवढी पैशाची पिके घेऊन उरलेल्या जमिनीत स्वत:च्या घरासाठी पिके घेण्याची त्यांची भूमिका होती. १९५४ साली ते खास शेती करण्यासाठी म्हणून कोल्हापूर सोडून कोवाडला येऊन स्थायिक झाले. तोपर्यंत ते अधूनमधून येऊन जात होते. आपल्या इनामाची गावे आहेत तरी कशी ते पाहण्याच्या निमित्ताने दर मुक्काम करत, हिंडत-फिरत, खात-पीत, वस्ती करत ते सर्व गावांना गेले. जंगलांचा, बेरडांच्या जीवनाचा, त्यांच्या जगण्याच्या तऱ्हांचा, स्वभावांचा त्यांना भरपूर अनुभव घेता आला. त्यातूनच त्यांच्या बेरडांविषयीच्या कथा आणि 'बारी' सारखी कादंबरी आकाराला आली.

कोल्हापुरातील जीवनाची शिदोरी घेऊन ते कोवाडला गेले. निसर्गाची विविध रूपे उघड्या डोळ्यांनी पाहिली. आपण स्वत: पाहिलेले, आपल्याला उमजलेले जीवनच 'बारी', 'माझा गाव', 'समिधा' यासारख्या कादंबऱ्यांतून, काही नाटक-कथांतून त्यांनी रंगवले. आपलं गाव, वाडा, शेती, शेतकरी, प्राणी, पक्षी या सर्वांत ते रमले. तीच त्यांच्या जीवनाची साधनसामग्री बनली. यातूनच वाङ्मयीन वास्तवाला गडद अनुभवांचा आणि उत्कट आदर्शाचा स्पर्श हवा, अशी भूमिका तयार झाली. म्हणून केवळ रंजनवादी दृष्टी न बाळगता त्यांनी सदैव भोवतालच्या वास्तव जीवनाचा विचार केला.

कथा, कादंबरी आणि नाट्यलेखनासाठी सतत वाचन, चिंतन, मनन, प्रवास, परिश्रम यामुळे रणजित देसाईंचे प्रकृतीकडे बरेचसे दुर्लक्ष झाले. मानसिक ताणतणावाचा परिणाम होऊन मधुमेह, रक्तदाब यासारखे विकार बळावत गेले. शेवटी शेवटी औषधोपचारांनाही प्रतिसाद मिळाला नाही आणि ६ मार्च १९९२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच त्यांच्या वाचकांना, मित्रमंडळींना आणि अभ्यासकांना धक्का बसला. प्रा. आनंद यादव लिहितात, ''दादा गेले आणि त्यांचं एक हिरवंगार हृदय जंगल जळून खाक झालं. त्यांचा निर्मळ डोळ्यांचा, प्रांजळ वागणारा, रसिक डोळ्यांनी जंगलांचं जग पाहणारा शेकरा मात्र आठवत राहतो. तोही शेवटी काळाचं भक्ष्य ठरला .... एकाएकाच्या जीवनात असं जंगल जन्माला येतं. नियतीच्या निर्दय खेळात जळून भस्मसात होतं. तिथं फक्त राख उरते. जंगलाच्या जळक्या खुणा शिल्लक रहातात. या जंगलाचा साक्षी असलेला शेकराही शेवटी काळाच्या पंज्याखाली चिरडला जातो आणि सगळा खेळ संपून जातो.''[१]

शेवटच्या काही वर्षांत त्यांच्या जीवनात खूप वादळे उठली. वरचेवर त्यांना दवाखान्यात दाखल करावे लागले. त्यामुळे मनानेही ते दिवसेंदिवस अधिकच हळवे बनत गेले. एक विशिष्ट प्रकारचे एकाकीपण त्यांना टाळता आले नाही. नातेवाईक व मित्रमंडळी त्यांच्यावर मनापासून प्रेम करत होती. त्यांची सर्वप्रकारची काळजी घेतली जात होती. पण- ''समुद्री चहुकडे पाणी । पिण्याला थेंबही नाही'' अशी त्यांची कांहीशी शोककारक व चमत्कारिक अवस्था झाली होती. अर्थात, आपल्या कलाकृतींमधून शोकात्मिक स्वरूपाचे चित्रण करण्यात मात्र त्यांना धन्यता वाटत होती. शेलीचे "Our sweetest songs are those that tell us sadest thought." हे विधान त्यांना अर्थपूर्ण वाटायचे. त्यांच्या साहित्यनिर्मितीवर या विधानाची विलक्षण छाप पडल्याचे त्यातील शोकात्म आशयावरून स्पष्ट होते.

**रणजित देसाई यांचा साहित्य परिचय :-**

## कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रूपमहाल | १९५२ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| २) | मधुमती | १९५८ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ३) | कणव | १९६० | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ४) | जाण | १९६२ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ५) | कातळ | १९६५ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ६) | गंधाली | १९७१ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ७) | कमोदिनी | १९७८ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ८) | आलेख | १९७९ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ९) | मोरपंखी सावल्या | १९८४ | अजब पुस्तकालय, कोल्हापूर |
| १०) | मेघ | १९८९ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ११) | आषाढ | १९८९ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १२) | वैषाख | १९८९ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १३) | मेखमोगरी | १९९० | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १४) | प्रपात | १९९१ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १५) | संकेत | १९९१ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १६) | बाबुलमोरा | १९९१ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |

## चित्रपट कथा

| | | |
|---|---|---|
| १) | रंगल्या रात्री अशा | १९६२ |
| २) | संगोळी रायाण्णा (कन्नड) | १९६३ |
| ३) | सवाल माझा ऐका | १९६४ |
| ४) | नागीण | १९८१ |

## ललित लेखसंग्रह

१) स्नेहधारा (संपादक - पांडुरंग कुंभार) - १९९७, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

## कविता

१) 'ज्वाला' दिवाळी अंक, १९९२ (संपादक - कृष्णा मुचंडी), १५ कविता प्रकाशित

## कादंबरी

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बारी | १९५९ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| २) | माझा गाव | १९६० | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ३) | स्वामी | १९६२ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ४) | श्रीमान योगी | १९६८ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ५) | राधेय | १९७३ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ६) | समिधा | १९७९ | अजब पुस्तकालय, कोल्हापूर |
| ७) | लक्ष्यवेध | १९८० | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ८) | पावनखिंड | १९८१ | अजब पुस्तकालय, कोल्हापूर |
| ९) | राजा रविवर्मा | १९८४ | अजब पुस्तकालय, कोल्हापूर |
| १०) | अभोगी | १९८७ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ११) | प्रतिक्षा | १९९४ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १२) | शेकरा | १९९६ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |

## नाटक

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वारसा | १९७४ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| २) | गरूडझेप | १९७४ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ३) | स्वामी | १९७५ | देशमुख आणि कंपनी, पुणे |
| ४) | हे बंध रेशमाचे | १९७५ | देशमुख आणि कंपनी, पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | रामशास्त्री | १९८३ | अजब पुस्तकालय, कोल्हापूर |
| ६) | धन अपुरे | १९८४ | वरेरकर नाट्यसंघ, बेळगाव |
| ७) | लोकनायक | १९९७ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ८) | तानसेन | १९९७ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ९) | श्रीमान योगी | १९९७ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १०) | कांचनमृग | २००० | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| ११) | पंख जाहले वैरी | २००० | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे |
| १२) | पांगुळगाडा | (अप्रकाशित) | |
| १३) | तुझी वाट वेगळी | (अप्रकाशित) | |

**रणजित देसाई यांना मिळालेले पुरस्कार :-**

**मानपत्र**

१) आर्टस् सर्कल, बेळगाव, ११ फेब्रुवारी १९७३

२) जिल्हा परिषद, कोल्हापूर, १५ जुलै १९७३

३) प्रेस क्लब ऑफ अहमदनगर, २ सप्टेंबर १९८४

४) जिल्हा परिषद, अहमदनगर, ३ सप्टेंबर १९८४

५) सार्वजनिक वाचनालय, बेळगाव, १३ डिसेंबर १९८८

६) पुणे येथे संपन्न झालेल्या स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर साहित्य संमेलनात पाक्षिक रूद्रवाणी तर्फे सन्मानपत्र, २९ डिसेंबर १९८९

## पारितोषिके

१) महाराष्ट्र राज्य पारितोषिक (स्वामी), १९६२

२) हरी नारायण आपटे पारितोषिक (स्वामी), १९६३

३) साहित्य अकादमी पारितोषिक (स्वामी), १९६४

४) भारत सरकार तर्फे 'पद्मश्री' पुरस्कार, १९७३

५) आचार्य अत्रे मानचिन्ह, १९७५

६) महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट कथालेखन पुरस्कार (नागीण), १९८०

७) महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र गौरव पुरस्कार, १९९०

## नाट्यलेखनासाठी मिळालेली पारितोषिके

१) महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत उत्कृष्ट नाट्यलेखनाचे प्रथम पारितोषिक (कांचनमृग), १९६६-६७

२) महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव स्पर्धेत कोल्हापूर केंद्रात द्वितीय पारितोषिक (वारसा), १९६७

३) बृहन्मुंबई मराठी नाट्य स्पर्धा, दिल्ली प्रथम पारितोषिक (कांचनमृग), १९६७-६८

४) महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात अंतिम फेरीत आठव्या क्रमांकाचे पारितोषिक (वारसा), १९६८

५) बृहन्महाराष्ट्र शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाने दिल्ली येथे आयोजित केलेल्या नाट्यस्पर्धेत प्रथम पारितोषिक (लोकनायक), १९७६

रणजित देसाई यांच्या स्वामी, श्रीमान योगी, राजा रविवर्मा, राधेय यासारख्या कादंबऱ्यांचे अनेक भाषेमध्ये अनुवाद झालेले आहेत.

## ब) अरविंद दाढे :-

**- <u>अल्पपरिचय</u> -**

वर्षानुवर्षे शिवचरित्र चिंतनात आणि कथनात गढून गेलेले, बुडून गेलेले एक शिवशाहीर म्हणजे अरविंद दाढे सर. वर्गात इतिहास साकार करणारे व लोकसभांतून ते सादर करणारे बाबासाहेब पुरंदऱ्यांनंतरचे दुसरे शिवशाहीर म्हणजे श्री. दाढे !

अरविंद दाढे यांचे वडील स्व. श्री.ग. दाढे हे संस्कृत व इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत केलेला विद्याव्यासंग त्यांना प्रेरणादायी ठरला. ही स्फूर्तिज्योत प्रज्वलित ठेवण्याचे कार्य केले. त्यांच्या कनिष्ठ बंधूंनी देखील त्यांना खूप मदत केली. त्याचप्रमाणे अनेक जीवाभावाच्या मित्रमंडळींचे तनामनांनी, त्यांनी केलेल्या मदतीचे फलित म्हणजे 'महारूद्र बाजीप्रभू' ही ऐतिहासिक कादंबरी !

मती गुंग करणाऱ्या अगम्य चकव्यांनी शत्रूच्या हातावर तुरी देऊन शत्रूवर मात करण्याची शिवछत्रपतींची किमया थक्क करून सोडते. साहस, पराक्रम व कर्तबगारीने ओथंबून भरलेल्या इतिहासाचे दर्शन पावला-पावलावर शिवछत्रपतींच्या जिवलगांनी घडवलं. अशा अनेक प्रसंगांनी शिवछत्रपतींच्या, अन् मराठ्यांच्या देदीप्यमान इतिहासाची पाने भरलेली आहेत.

या अद्‌भुत आणि साक्षात्कारी इतिहासाला जगाच्या इतिहासात तोड नाही. एकापेक्षा एक इतिहासाची अद्‌भुत साहसाने भरलेली पाने प्रत्यक्ष साकार करणारी अनेक माणसे शिवछत्रपतींच्या अनमोल खजिन्यात होती.

त्यापैकीच एक सोनेरी चित्तथरारक पान बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल देशमुखांनी निर्माण केलंय. ते पान नक्की लेखकाच्या मनात केव्हा रूजलं हे सांगता येत नाही. पण याचा शोध घेण्यासाठी साठ पासष्ठ वर्षे मागे जावे लागेल !

सातारा जिल्ह्यातील छोट्याशा औंध संस्थानात ९ फेब्रुवारी १९३९ रोजी त्यांचा जन्म झाला आणि तेथेच ते लहानाचे मोठे झाले. त्या वेळचे औंध संस्थानाधिपती

कै. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, छत्रपतींच्यावर नितांत श्रद्धा आणि निष्ठा असणारे वास्तवात शिवशाही जगत होते. त्यांच्या साक्षीभूत इतिहासाचा संस्कार त्यांच्या मनात खोलवर रूजत होता.

त्या औंधच्या राजवाड्यातील कराड देवीच्या समोरील महालात भरणारा तो दरबार ! साक्षात शिवशाही डोळ्यांपुढे उभी करीत होता. श्रीमंत बाळासाहेबांच्या स्तुतीची ललकारी देत पुढे येणारा मावळी पोशाखातील भाट आणि त्या ललकारी बरोबरच सरदार पोळांच्यासह साऱ्या दरबारातील मानकऱ्यांचे राजाला झडणारे मुजरे आणि ती दसऱ्याची सजवलेल्या, कलाकुसरींनी नटवलेल्या दिमाखदार हत्तीवरून राजवाड्यांपुढून शिलंगणासाठी निघणारी भव्यदिव्यशाही मिरवणूक त्यांना इतिहासात केव्हा घेऊन जात असे ते कळत नसे.

राजवाड्याच्या शेजारीच असणाऱ्या अंबाबाईच्या मंदिरातील शिवछत्रपतींच्या जीवनावर आधारीत स्वत: राजे साहेबांनी रेखाटलेली अतिसुंदर चित्रे डोळ्यांसमोर जिवंत इतिहास उभा करीत असत.

जिजाऊ माँसाहेबांच्या डोहाळ्यापासून ते शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या शाही साहेळ्यापर्यंत आणि राज्याभिषेकाच्या नंतर हत्तीवरील मिरवणुकीपर्यंतची सारी चित्रे मनात काही विलक्षण स्पंदने निर्माण करीत असत. कराडदेवीच्या शाही महालात पुराणकथांपासून तो ऐतिहासिक कथानकांवर होणारी हरिदासी कीर्तने. अद्‌भुत आणि वीररसांनी ओथंबून भरलेली ती कीर्तने लखुबुवा यांच्यासारखे हरिदास औंधमध्ये जिवंत, साक्षीभूत इतिहास जागवत होते.

गुणी, विद्वान आणि रसिक राजाच्या कृपाछत्राखाली फाल्गुन महिन्यात शिमगा स्पोर्टस् आणि वसंतोत्सव साजरा केला जात असे. त्या महोत्सवात अनेक ऐतिहासिक नाटके रोज रात्री नवरात्र मंडपात साजरी केली जात असत. त्या नाट्यगृहात सामान्य प्रजाजनापासून राजपुत्रांपर्यंत सारेजण भाग घेत असत. या नाटकात खऱ्या ढाली, तलवारी, भाले, बर्चे आणि

15327

पहाडा-जंगलांची, गडाकोंटाची भव्य ड्रेपरी साऱ्या समाजाला त्या काळात केव्हा घेऊन जायची ते कळायचे नाही.

या सर्व वातावरणात 'बाजीप्रभू देशपांडे' या भव्यदिव्य इतिहास पुरूषाने लेखकाच्या हृदयात नक्की केव्हा खोल घर केलं ते त्यांना सांगता येणार नाही. पण असेच एकदा बाजीप्रभूंच्या जीवनावरील आणि पन्हाळ्याच्या प्रसंगावरील नाटक झालं. नवरात्र मंडपातल्या स्टेजवर उभी केलेली गजापूरची खिंड - अक्षरश: जंगलात उभी होती आणि तो गजापूरच्या पावनखिंडीमधील रूद्रपराक्रमाचा इतिहास, तो साकारलेला चित्तथरारक इतिहास ते भान हरपून पाहत होते. ती बुलंद आवाजाची भव्यदिव्य माणसे अगदी खरी वाटत होती. ते असंख्य जखमांनी रक्ताळलेले बाजी, त्या गजापूरच्या खिंडीत कोणाच्या तरी मांडीवर पडलेले होते. त्या प्रसंगाचा लेखकाच्या बालमनावर खोल परिणाम झाला होता. त्या इतिहासाने त्यांच्या जीवनाला चेतना व प्रेरणा दिली होती. बाजीप्रभूंचा तेजोमय इतिहास त्यांच्या बुद्धीच्या कुवतीने त्यांनी कादंबरीरूपाने मांडण्याचा प्रयत्न केला. अस्सल ऐतिहासिक माहिती जेथे मिळणार नाही तिथे चिंतनातून कल्पनाशक्तीचा उपयोग केला आहे.

उदा. बाजीप्रभूंचा जन्म शिंद (भोर ता. शिंद) मध्ये निश्चित झाला पण त्यांच्या बारशाचा प्रसंग चांद्रसेनीय कायस्यांच्या पारंपरिक पद्धतीने कल्पनेने उभा केला. त्यावेळच्या सैनिकी शिक्षण देण्याच्या पद्धती, गावोगावच्या यात्रा, कुस्त्यांचे फड, सामाजिक चालीरीती यांचा उपयोग बाजींचे कादंबरीमय जीवन चरित्र साकार करताना त्यांनी केला. बाजीप्रभूंच्या हिरडस मावळातील त्रेपन्न वतनी गावांतून ते हिंडले. नीरा, वेळवंडी, गंजवणी यांच्या काठाकाठांनी ते खूप भटकले. कासारखिंडीतला जेधे बांदलांचा संघर्ष त्यांनी अनेकवेळा त्या नांदगावच्या जवळ असणाऱ्या कासारखिंडीत उभे राहून डोळ्यांपुढे उभा करण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे बाजीप्रभूंच्या अगोदरच्या पिढ्या याचाही दाखला दिला आहे. बाजींनी सांडलेल्या रक्ताचं, मातृभूमीच्या रक्षणासाठी केलेल्या त्यागाचं पुढच्या पिढ्यांसाठी जागरण व्हावे या हेतूने त्यांनी 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी लिहिली.

सर्व शिक्षणप्रक्रियेत शिक्षकांचे स्थान सर्वोच्च असते. सर्व शैक्षणिक वातावरणातील अत्यंत प्रभावी व्यक्ती म्हणजे शिक्षक. एक शिक्षक हजारो विद्यार्थ्यांची मने घडवू शकतो. सारी शिक्षणप्रक्रिया प्रेममय करावी, यशस्वी, यशमय करावी, विद्यासंपन्न करावी या हेतूने खऱ्या शिक्षकांची धडपड सतत सुरू असते. अशा शिक्षकांच्या वृत्तीमध्ये निर्भयता व कल्पकता असते. विद्यार्थ्यांच्या हिताची दक्षता असते. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता असते, तर वाणीत नम्रता असते, डोळ्यांत सतेजता आणि हृदयात सर्व विद्यार्थ्यांविषयी प्रेमभावना असते. असा शिक्षकच शिक्षण क्षेत्रातील एक अनोखा आनंदयात्री होऊ शकतो. अरविंद दाढे हे असेच आनंदयात्री आहेत.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीच्या आशीर्वचनामध्ये प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी अरविंद दाढे यांच्या कादंबरीविषयी म्हटले आहे, ''महारूद्र बाजीप्रभू हे एक साक्षात रूद्रावतार होते. नव्हे ते महारूद्र होते ! या महारूद्राची कथा श्री. दाढे यांनी वाचकांच्या नजरेसमोर उभी केली आहे. भारावलेल्या वाचकाला क्षणभर वाटून जाईल की आपणही असाच धारातीर्थी देह ठेवावा. एका शिवभक्ताने लिहिलेले हे महारूद्र स्तोत्र घराघरात वाचले जाईल, असा विश्वास वाटतो.''[२]

## पारितोषिके

१) मसूर ता. कराड येथील समर्थ व्याख्यानमालेतर्फे कै. यशवंतराव चव्हाण त्यावेळेचे गृहमंत्री (भारत सरकार) यांच्या हस्ते सत्कार

२) पुणे महानगर पालिकेतर्फे व्यसनमुक्ती या कार्याप्रीत्यर्थ २६ जानेवारी २००३ मध्ये सत्कार

३) १९७४ साली शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी महोत्सवात सातारा येथे कै. श्रीमंत छत्रपती अभयसिंह महाराज यांच्या उपस्थितीत शिवशाहीर म्हणून गौरव

४) 'महारूद्र बाजीप्रभू' कादंबरीस ध्येयप्रतिष्ठान पुरस्कार

५) वीररत्न बाजीप्रभू देशपांडे यांची ३४८ वी पुण्यतिथी निमित्त सन्मानचिन्ह -

श्रीमंत सरदार स.ह. गुप्ते, सी.के.पी. कार्यालय ट्रस्ट, पुणे, श्री. केदार जननी देवस्थान मंडळ

६) पारायणाचार्य पुंडलिकजी महाराज वेळूकर - गौरवचिन्ह

७) दीपस्तंभ व्याख्यानमाला - स्व. गऊबाई निवृत्ती जगताप मेमोरियल चॅरिटेबल फाऊंडेशन, सासवड सन्मानचिन्ह - २००७

## अरविंद दाढे यांचा साहित्यपरिचय

१) दारिद्र्यरेषा - ग्रामीण कथा - रंगतरंग दिवाळी विशेषांक, १९९८

२) प्रा. शिवाजीराव भोसले-एक अष्टपैलू वक्ता - अपेक्षा दीपावली विशेषांक, २००२

३) जाणता राजा - रंगतरंग दिवाळी विशेषांक, २००२

४) भारतीय संस्कृती-एक तेजोमय दर्शन - अपेक्षा संस्कार आणि संस्कृती दीपावली विशेषांक, २००४

५) साक्षरता अभियान (ग्रामीण कथा) - अमृतघट दीपावली विशेषांक, २००४

६) पुंडलिक महाराज वेळूकर-एक सौजन्यशील व्यक्तिमत्त्व (जीवनसार) - साप्ताहिक धनसंतोष दीपावली विशेषांक, २००५

७) स्वातंत्र्याची साठ वर्षे-एक सिंहावलोकन - स्वातंत्र्यदिन विशेषांक, २००८

८) तुकाराम महाराजांच्या जीवनात ब्राह्मणांचे स्थान - अपेक्षा दीपावली विशेषांक, २००८

## कादंबरी

१) महारूद्र बाजीप्रभू - अक्षयविद्या प्रकाशन, २००८

२) तानाजी मालुसरे - प्रकाशनाच्या मार्गावर

३) सकलसौभाग्यसंपन्न पुतळाबाईसाहेब - प्रकाशनाच्या मार्गावर

त्याचप्रमाणे त्यांना खंडाळा शिरवळ रोटरी क्लबचा प्रथम आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 'राजमाता जिजाऊ माँसाहेब' या विषयावर जवळजवळ एक हजार व्याख्याने दिली आहेत.

# संदर्भसूची

१) यादव आनंद - विशाखा, दिवाळी १९९२, पृ. ९२.

२) दाढे अरविंद-महारूद्र बाजीप्रभू, आशीर्वचन - शिवाजीराव भोसले, अक्षयविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७, पृ.क्र. १०.